IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# कुर्ला गावाच्या परिसरातील होलिका उत्सव

**सहा. प्रा. सौ. स्वाती नवनाथ पवार**

**M. A. B.Ed (मराठी विभाग)**

एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय महाड. रायगड

**बीज शब्द:** लोकोत्सव, होळी, खाडीपट्टा, ग्राम  देवता, बहुजन समाज, आधुनिकता.

## प्रस्तावना

प्रस्तावना कोकणातील माणूस आणि सण उत्सव यांचे अलौकिक अतूट असे नाते आहे कोकणात होळी या सणाला शिमगा असे म्हणतात कोकणात विशेषता रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील कुर्ला या गावातील शिमगा उत्सवा च्या सणाबद्दल म्हणायचे झाले तर हा शिमगा उत्सव पाच ते दहा दिवस चालतो प्रथेप्रमाणे फाल्गुन शुद्ध द्वादशी त्रयोदशी आणि पौर्णिमेला होळीचा मुख्य दिवस असतो यावेळी शेवरीचे लाकूड आंब्याचं किंवा वेगवेगळ्या झाडांची लाकडं याला हळकुंड असे म्हणतात.

होळी हा एक लोकोत्सव आहे. याला उत्तरेत होरी, महाराष्ट्रात होळी, कोकणात शिमगा, गोवा राज्यात शिग्मा, शिग्मो ह्या नावांनी ओळखला जातो. ह्या उत्सवाला भारताच्या इतर भागात हुताशनी महोत्सव आणि दोलायात्रा, कामदहन अशीही नावे आहेत.

देशी नाममालेत *हेमचंद्रा* ने ह्या लोकत्सवाला 'सुगिम्हअ' (सुग्रीष्मक) असे म्हटले आहे. सुगिम्हअ वरून शिग्मा हा शब्द आला आणि वर्णविपर्यासाने त्याला शिमगा हे नाव पडले. ते महाराष्ट्रात रूढ आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत लेखिकेने प्रत्यक्ष स्वतः फिरून, उत्सव प्रसंगी हजर राहून निरीक्षणे नोंदविली आहेत. गरजेनुसार मुलाखती, छायाचित्रणाचा वापर केला आहे. मुलाखती  घेणे  लोकगीते  आणि उपलब्ध प्रकाशित आणि अप्रकाशित अशा प्राथमिक तसेच दुय्यम साधनांचा वापर केलाआहे.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

**कालावधी**

शालिवाहन शकाच्या मासगणनेप्रमाणे शेवटचा महिना जो फाल्गुन त्यात फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंत हा उत्सव करावा, असे म्हटलेजाते. इंग्रजी कालगणने नुसार हा सण साधारण मार्च महिन्याच्या मध्यात येतो. फाल्गुन शुक्ल नवमीपासून फाल्गुनी पौर्णिमेपर्यंत हा उत्सव साजरा केला जातो.

या कालावधीत वसंत ऋतूची सुरुवात होत असते. त्याचे स्वागत करण्यासाठी देखील हा उत्सव साजरा केला जातो, अशी ह्या सणाची एक उत्पत्ती दिली जाते.

**पौराणिक माहिती**

होलीका, ही हिरण्यकश्यपूची बहीण असून भक्त प्रल्हादाला ठार मारण्यासाठी तिने पृथ्वीतला वर आगमन केले. लहान मुलांना घातक ठरणाऱ्या राक्षसिणींशी ह्या उत्सवाचा संबंध आहे. कृष्णाचा वध करायला आलेल्या पूतनेचे उदाहरण प्रसिद्ध आहे. होळी ही एका मुद्दाम खणलेल्या खड्ड्यात गवत, लाकूड, गोवऱ्या पेटवून केली जाते. पूतनेला स्वतः कृष्णाने ठार मारले तथापि होलाका, ढूंढा ह्या राक्षसिणींचे दहन केल्याच्या पुराणोक्त कथा आहेत. मदनाचे शिवाने दहन केल्याच्या कथेशीही होळीच्या उत्सवाचा संबंध जोडण्यात येतो.

ह्या सणाच्या संदर्भात भविष्यपुराणा त ढूंढा राक्षसिणीची कथा आलेली आहे. ती अशी एकदा ही राक्षसीण गावात शिरून मुलांना त्रास देत होती. गावकऱ्यांनी तिला घाणेरड्या शिव्या देऊन मोठा अग्नी पेटवला आणि तिला पळवून लावले. होळीच्या उत्सवात बोंबा मारून अश्लील शब्द उच्चारतात, ह्याचे मूळ ह्या कथेत सापडते.

**होळी सण साजरा करायची पद्धत**

होळी पौर्णिमेच्या सायंकाळी व्रत कर्त्याने शुचिर्भूत होऊन 'ढूंढा राक्षसिणीच्या पिडेचा परिहार व्हावा, म्हणून मी कुटुंबासह होलिकेची पूजा करतो', असा संकल्प प्रकट करावा. नंतर होलिकेची षोडशोपचारे पूजा करावी. त्यानंतर होलिकेची प्रार्थना करून होळीला तीन प्रदक्षिणा घालाव्यात आणि मग होळी पेटवावी. नंतर बोंबा ठोकाव्यात.

माघी पौर्णिमा, म्हणजे उत्सवाआधी एक महिना गावाच्या मध्यभागी एरंडाची एक फांदी पुरतात आणि होळीची मुहूर्तमेढ रोवतात. फाल्गुन शुद्ध पंचमीपासून होळीसाठी लाकडे, गोवऱ्या, पेंढा इ. जमा करावयास आरंभ होतो. हे सर्व जळाऊ साहित्य चोरून आणायचे

असते. होळी जळून गेल्यानंतर दुधातुपाचे शिंपण तिच्यावर करून शांत केली जाते. होळीची राख दुसऱ्या दिवशी विसर्जित केली जाते. होळीच्या पाठोपाठ धूळवड आणि रंगपंचमी येते. रंगपंचमीला एकमेकांच्या अंगावर पिचकाऱ्यांनी रंग फेकला जातो.

वेगवेगळ्या राज्यांत होळी वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. बंगालमध्ये फाल्गुन शुद्ध चतुर्दशीला उत्सव सुरू होतो. त्याला दोलायात्रा म्हणतात. घरचा यजमान त्या दिवशी उपास करतो. सकाळी कृष्णाची आणि सायंकाळी अग्नीची पूजा तो करतो. नंतर उत्सवासाठी आलेल्या लोकांवर फल्गू (गुलाल) उधळतात. घराबाहेर एक गवताची मनुष्याकृती तयार केलेली असते. ती जाळतात.

## कुर्ला आणि परिसरात सण साजरा करायची पद्धत

गवताच्या  मोळी आणून त्याचा होम केला जातो ज्यामध्ये मागच्या वर्षीच्या होळीचा जो खुंट शिल्लक असतो तिथे एक मोठा खड्डा म्हणून उभा करतात अशा री तिने होम रचला जातो जाळण्याच्या आधी मंदिराभोवती व होमा भोवती फिरून फार बोलले जाते यावेळी गावातील नवीन जोडपी या होमात नारळ देतात होळीच्या दुसऱ्या दिवशी गावातील गावातील गावकरी ग्रामदेवतेची पालखी सजून त्या देवीच्या मुर्त्या ठेवून पालखी देवळातून साने वर आणली जाते नंतर साने वरून ढोल ताशाच्या गजरात पालखी चे मूळ गावामध्ये आगमन होते तेथील हनुमानाच्या मंदिरात समोर पालखी ठेवून रात्री नऊ व दहाच्या सुमारास पालखी नाचवण्याचा कार्यक्रम सुरू होतो.

कुर्ला आणि आजूबाजूच्या परिसरात शिमगा हा सण पाच ते सहा दिवस साजरा केला जातो गावातील जे मानकरी असतात त्यांच्याकडे वर्षभर असलेले मुखवटे होळी व दसऱ्याच्या सणाला बाहेर काढले जातात

होम लागण्यापूर्वीमंदिरातील देवदेवतांच्या मुर्त्या सजवून ती पालखी  मंदिराभोवती व होमाच्या भोवती फिरून फाग बोलण्याची प्रथा आहे दुसऱ्या दिवशी मंदिरातून पालखी साने वर आणली जाते त्याला साना भरणे असे म्हणतात काही गावांमध्ये पालखी पाच ते सहा दिवस साने वरच असते आणि साने वरच गावातील महिला ओटी भरतात तर काही कामांमध्ये घरोघरी पालखी जाते  त्यावेळी महिला शाल नारळ पेढे यांनी ओटी भरतात वंशपरंपरागत चालत आलेले मानकरी पाटील यांच्याकडे ती वस्ती करते.

होळी गावदेवच्या मंदिरं पुढे लावली जाते. होळी लावण्यापूर्वी तिला फेरी मारतात. त्यावेळी सर लोक तिला आणि इतर देवताना तिथे उपस्थित होण्याचे आवाहन करतात. त्या आवाहनाला फाक किंवा फाग असे संबोधले जाते. ही फाग  पुढील प्रमाणे म्हटली जाते

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

“हाकरीला तारू गेला समिंदराकाठी
समुद्राच्या काठी एक कलकीचा बेट
त्या रे बेटी एक कोंब निपजला
तो कोंब काय लवलव करी
सोन्याच्या सुरीने कोंब कापीयेला
तो कोंब गेला गवल्याच्या घरा
गवल्याच्या घरा गेला दुधानेमडपिला
तो कोंब गेला शिंप्याच्या घरा
शिंप्याच्या घरा गेला सुतान मडपिला
तो कोंब गेला सोनाराच्या घरा
सोनाराच्या घरा गेला सोना मडपीला
तो कोंब गेला सुताराच्या घरा
सुताराच्या घरा गेला पालखी घडविला
सोन्याचं नाम भलं रुपयाचं ठस
या पालखीत कोण देव बस या पालखीत जनाबाई बस
या पालखीत सोमजाई बस
सोन्याचं नामभलं रुपयाचं ठस
या पालखीत कोण देव बस
या पालखीत कालकाई बस या पालखीत वाघजाई बस
सोन्याचं नाम भल रुपया ठस
या पालखीत कोण देव बस या पालखीत होमदेव बस
या पालखीत महादेव बस.

नीट निरीक्षण केले तर होम किंवा मोठी होळी लावताना गावातील सर्व मानकरी वाडी वस्तीतील सर्व सांमजाच्या माणसाकडून त्यास सजऊन घेतले जाते. एरव्ही देवळात असलेले देव गावच्या बाहेर आणून सहाणे वर बसविले जातात. सहाण म्हणजे देवाची पालखी ठेवण्यासाठी उभारलेला असतो. यावर देव आणतात येथेच गावातील सर्व लोक येऊन देवाचे दर्शन घेतात. देवाची पालखी सर्व वाड्यांवर फिरवली जाते. मोठे उत्साहाचे वातावरण असते. कारण त्यांचा देव घरी येणार असतो.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

कोकणात या दिवसात गावात राधा नाचविली जाते. राधा हे पुरुषाने करायचे पात्र आहे, गावतील एखाद्या कोवळ्या वयाच्या मुलाला स्त्रीचे कपडे देऊन नाटविले जाते. गावातील घरोघरी जाऊन त्यास नृत्य करायचे आसते. याच वेळी गावातून विशिष्ट रक्कम घरपट गोला केली जाते. यास स्थानिक लोक पोस्त असे म्हणतात. अनेक ठिकाणी पुढील वर्षी राधा कोण होणार हे गावाच्या अनुमतीने ठरविले जाते. या बाबत ओडिशात कृष्ण उत्सव साजरा करतात त्याची आठवण होते. ओडिशात कृष्णमूर्ती पालखीतून मिरवीत नेतात. घराघरातले लोक बाहेर येऊन कृष्णमूर्तीला अत्तर लावतात आणि गुलाल उधळतात.

महाराष्ट्रात सामान्यतः फाल्गुनी पौर्णिमेला होळी पेटवली जाते. होळीला पुरणपोळीचा नैवेद्य करतात. दुसऱ्या दिवशी होळीवर तापवलेल्या पाण्याने स्नान केले जाते.

गोव्यात होळीच्या उत्सवात बीभत्सपणा फारसा नसतो. लोक नाचतात, गातात. होळीसाठी एक १५–२० हात उंचीचा वृक्ष पाडून ठेवलेलाअसतो. होळीच्या रात्री ढोलकी वाजवीत लोक वृक्षाकडे जातात. त्याची पूजा करून त्याच्या फांद्या तोडतात. मग तो सोट खांद्यावर घेऊन देवळाकडे जातात. तेथे होळीसाठी खड्डा खणून ठेवलेला असतो. त्यात तो सोट उभा करून आंब्याच्या पालवीने सजवितात. त्याच्या डोक्यावर एक असोला नारळ ठेवतात. होळीला हळदकुंकू वाहतात. नारळ फोडतात. ह्या वेळीमात्र बोंबा मारून अश्लील शब्द बोलतात.

**सारांश**

होळी हा सण गावात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. बहुजन समाजात अनेक जाती मंदिरात जात नव्हत्या. समाजाने त्यांस बंधने घातली होती. जाती पातीत विभागलेला समाज या निमित्ताने सर्व एकत्र येतात. त्यामुळे या सणात देव स्वतच्या घराशी अंगणात भेटायला येणे ही कोकणकरांसाठी फार महत्वाची गोष्ट. प्रत्येक भारतीय सणाचा निसर्गाशी खूप जवळचा संबंध आहे. परंतु सध्या होळीच्या सणात होणारी वृक्ष तोड पहिली की एक अनामिक भीती दाटून येते. पूर्वी या सणाचा उद्देश काढचीत वेगळा असेल पण आता याचा पुनर्विचार करायची गरज आहे. पर्यावरणपूरक सण-उत्सवांची गरज निर्माण झाली आहे कारण असे, की माणसाच्या जीवनात जो शांतपणा, जे स्वास्थ्य असावं लागतं ते आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात तो हरवून बसलेला आहे.सर्व प्रकारचे सण टप्प्याटप्प्याने साजरे करताना नातेसंबंधाची जपणूक, सकारात्मक ऊर्जा, मानवी संबंध, भक्ती, अध्यात्म ऊर्जेचा स्त्रोत मनात शांती, सकारात्मक दृष्टिकोन सणांच्या माध्यमातून निश्चितच निर्माण होतो. अर्थात हे तो तेंव्हाच करू शकेल जेंव्हा शाश्वत निसर्ग पूरक वातावरण तयार होईल. त्यामुळे होळी सारख्या सणाचे स्वरूप बदलण्याची गरज आहे.

Copyright to IJARSCT

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

**संदर्भ**

[1].ढेरे, रा. चिं, २०००, लोकदैवतांचे विश्व, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

[2].जोशी महादेव, १९६२, भारतीय संस्कृती कोश, खंड.

[3].डॉ.लोहिया, शैला, २०००, भूमी आणि स्त्री, गोदावरी प्रकाशन.

[4].*ऋग्वेदी श्री, २००१, आर्यांच्या सणांचा इतिहास, वरदा प्रकाशन, पुणे.*

[5].प्राचार्य कोळी विठ्ठल, २०१२. महाराष्ट्रातील लोकगीते एक गीतमय प्रवास, साकेत प्रकाशन पुणे.

[6].काणे पा.वा.धर्मशास्त्राच इतिहास, खंड ५.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in